आपण हा लेख www.maanavta.com या अध्यात्मिक वेबसाईट वर वाचत आहात.

संपादकीय

..... तर दु:ख नावाची बाबच राहणार नाही.

लेखक – श्री. राम कुमार 'सेवक' जी मुख्य संपादक – www.maanavta.com

कुठलेही गणतंत्र, जनतेच्या मानसीकतेवरच अवलंबुन असते, अर्थात कुणा देशाचे लोक जसे असणार तसाच तो देश ही असणार.

महानगरांत दररोजच प्रवास करावा लागतो, जवळचा जरी प्रवास असला तरी या प्रवासात खुप काही बघायला मिळते.

काही वर्षापासुन प्रवास करने सोपे झाले आहे, कारण दिल्लीत मेट्रो (भुयारी रेल्वे) ची सुरवात झालेली आहे. ही सुध्दा एक रेल्वेच आहे यात काही शंकाच नाही, पण ही रेल्वे इतकी स्वच्छ आहे की, गृहलक्ष्मी ही आश्चर्यचकीत होईल की इतकी स्वच्छता घरात का नाही?

दोन–तिन दीवसापूर्वीची घटना आहे – मेट्रो रेल्वे फलाटवर उभी होती, सुटणारच होती, मला वाटले की, गाडी चुकायला नको, परंतु दरवाज्यावर खुप प्रवासी गर्दी करून उभे होते. खरे तर गाडी आतुन खालीच होती परंतु काही प्रवासी दरवाज्यावर असे उभे होते जशी चीन ची भींत शतकानुशतके उभी आहे. मी जागा बघितली आणि ''त्यांना'' त्यांच्याच भाषेत उत्तर देत, बाणा सारखा डब्यात शिरलो. त्यांना बाजुला सारून आत जाऊन आरामात उभा राहीलो. दरवाज्यावर उभे असलेल्या लोकांनी माझ्यावर रागात काठाक्ष ठाकला, जसे त्यांच्या इतक्या विरोध केल्यावरही मी आत शिरून जनु काही अपराधच केला आहे. मी तर आरामात होतो, परंतू मला दु:ख याच गोष्टीचं होतं की मी त्यांना काही धडा शिकवु शकलो नाही. ते अजुन सुध्दा जसेच्या तसेच उभे होते, खरे तर त्यांच्या या सवयीमुळे कुंणा एखाद्याच्या जिवावर बेतले असते, कारण रेल्वेत चढतांना प्रवासी घाई–गडबडीत असतो, आणी दरवाजा मोकळा असल्याने सोईस्कर होते, परंतु दरवाज्यावर उभे राहणारे हया बाबींचा विचार न करताच येथे उभे राहीलेले असतात. एका नागरीकाच्या रूपात ही तर घोर बेपरवाही आहे. जर या बेपरवाहीमुळे कुणाचे जिवन जर संकटात सापडले तर हा मोठा अपराधच ठरेल.

परंतु याच दरवाज्यावर काल एक नवीन अनुभव आला. ज्यावेळी कुणी व्यक्ती आत आला, त्यावेळी दरवाज्यावर उभ्या असलेल्या व्यक्तीने म्हटले Excused, अर्थात माफ केले.

हे ऐकुन मला मनातल्या मनात खुप हसु येत होते, तो व्यक्ती दरवाज्याच्या एका बाजुला उभा होता, त्यामुळे मला वाटले की, हा इतका दोषी नाही आहे, तरीसुध्दा दरवाज्याजवळ उभ्या असल्याकारणाने चढणाऱ्यांच्या कारण होणारा त्रास त्याला सहन करावाच

लागेल. त्याला जो त्रास (असुविधा) होईल, त्याच्याकरीता हा विचार करत असेल की लोक म्हणतील Excuse me, (अर्थात माफ करा.)

खरे तर हे आहे की, Excuse me, कुणीच म्हणत नाही आणि तो त्रास सहन करत राहतो. हा त्रास त्याला मानसिक त्रस्त न करो त्याकरीता तो म्हणतोय – Excused, अर्थात की तुम्ही जरी माफी मागितली नाही तरी मी तुम्हाला माफ केले, जेणेकरून मला कुठलाही तणाव जाणवु नये (की त्याने माफी मागीतलीच नाही)

माझ्या निश्चित स्थळी उतरल्यावर जात होतो, रस्त्यात एक मोटारसाईकल बघितली, तिच्यावर लिहले होते, God is busy now, May I help you. (अर्थात भगवंत आता व्यस्त आहेत, मी आपली मदत करू शकतो काय?)

ही ओळ वाचुन मन प्रफुल्लीत झाले, की कीती सुंदरतेने या व्यक्तीने आपला मदतीचा प्रस्ताव समोर ठेवला आहे.

मला नाही वाटत की, भगवंत कधी आमच्या सारखा व्यस्त होत असेल, कारण तो आमच्या सारखा व्यक्ती नाही, व्यक्ती व्यस्त होतो, आराम करतो. भगवंत व्यक्ती नाही आहे, शक्ती आहे. शक्ती कधी थकत नाही. आमच्या घरात पंखे चालु आहे, दुरचित्रवाणी, संगणक, फ्रिज चालु आहेत, सर्वात विद्युत शक्ती कायम काम करीत आहे. आजपर्यंत मी ऐकले नाही की, या शक्तीने कधी म्हटले की, मी थकुन गेलेय.

शक्ती कधीच थकत नाही, व्यस्त ही होत नाही कारण ती आमच्या सारखी मन–बुध्दीच्या अधीन नाही. या शक्तीचा पाहिजे तितका उपयोग करा. ईश्वर ही असाच आहे, सर्वांची प्रार्थना हा ऐकतो. त्या प्रार्थनांच्या अनुसार ज्याला योग्य समजतो त्यावर कृपा (प्रसन्न) ही करतो (होतो). जमीन–आकाश, वृक्ष–पर्वत, नदी–समुद्र हे सर्व याच्याच अधीन आहेत, परंतु हा (परमात्मा, ईश्वर) नेहमी जसाचा तसाच राहतो.

त्या व्यक्तीने लिहले की भगवंत यावेळी व्यस्त आहे, म्हणजेच त्याची ही इच्छा आहे की, कुणीही गरजवंत त्याचा उपयोग करू शकतो. ही एक निर्मळ भावना आहे. भगवंताला व्यस्त म्हटल्याने भगवंताचे काही कमी होत नाही, आणी त्या व्यक्तीची सहकार्याभावनाही समोर येते हे चांगलेच आहे. परमेश्वरास मनुष्य आप–आपल्या भावनेनुसार बघतो.

एक मुलगा होता–अनाथ. तो म्हणायचा, हे प्रभु! तुझ्याजवळ घर नाही मला ही घर नाही, तुला भुख लागत नाही म्हणुन खाण्याची आवश्यकता भासत नाही, मला खावयास मिळत नाही. तुला परीधान करण्याची आवश्यकता नाही, मी वर्षोनुवर्षे एकच सदऱ्याने काम चालवतोय. तुझे ही कुणीच नाही, माझे ही कुणीच नाही, त्याकरीता तू आणि मी भाऊ–भाऊ आहोत.

भगवंताशी या प्रकारच्या गुजगोष्टी करून त्याला खुप समाधान मिळत असे, एका दीवशी एका पुजारीने हे ऐकले,

ज्या प्रकारे न्यायालयात वकील असतात त्याचप्रमाणे धर्मस्थानांवर पुजारी वा प्रबंधक असतात. वकील, तर्क–वितर्कांत पंडीत (हुशार), पुजारी व प्रबंधक–कर्मकांडात पंडीत. तो अनाथ मुलगा या दोघे ही पंडीतांपासुन अपरीचीत.

पुजारींजीनी त्याला समजवीले की, भगवंतास आपल्या सारखे समजतो मुर्ख. असे पाप करू नको, योग्य प्रार्थना कर. तो मुलगा नतमस्तक झाला. गरीब आणी लाचार व्यक्ती प्रत्येकासमोर नतमस्तक होऊन जातो.

म्हणतात की, रात्री पुजारीच्या स्वप्नात भगवंत आले, निरंकाराने धारण केले कुठले तरी रूप–शेवटी सर्व रूप तर याचेच आहेत. पुजारीला समजवीले की, त्या मुलाची प्रार्थना एकदम शुध्द होती, तु त्याच्यात अशुध्दता मिसळवीली. कधीतरी योग्य वागत जा. कायदे–नियमच सर्व काही नसते. माणासाची नितीमत्ताच सर्व काही असते. पुजारी आश्चर्यचकीत झाला.

त्या माणसाने भगवंतास व्यस्त सांगतीले, मन खुश झाले कारण लिहणाऱ्याची नितीमत्ता ठीक होती.

जनतेत प्रत्येक प्रकारची माणसं आहेत, जीवनदान देणारे सुध्दा आणी प्राण घेणारे सुध दा. याच प्रकारे आमचे गणतंत्र सुध्दा मिश्रीत आहे, एकीकडे प्रामाणिक माणसं तर दुसरीकडे भ्रष्ट आणि भ्रष्ट्राचार सुध्दा सर्वत्र दिसुन यतो. जीवनप्रवासात प्रत्येक प्रकारची माणसं भेटतात, बऱ्याच लोकांना बघुन संतापही येतो, परंतु त्यास दाबावा लागतो. जर आम्ही कुणामध्ये परीवर्तन करण्यात सक्षम नसणार तर त्यास तसाच स्विकार करावा लागेल.

शेवटी परमात्मा सुध्दा सर्वांचा स्विकार करीत आहे, अखेर कुणी कसा ही, का नसो.

आम्ही सुध्दा सर्वांसोबत याच प्रकारे सहजतेने समन्वय (adjust) साधु शकलो तर जीवनात दु:ख नावाची बाबच राहणार नाही.

राम कुमार 'सेवक'
rksewak@yahoo.co.in

अनुवादक
सुकदेव पाटील
sukdeo_behere@yahoo.co.in